CNR No :- MHSI100001612022

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३६/२०२२ :–

## –: निशाणी ४४ वरील आदेश :–

प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला ''विना कैफियत'' चा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ चे म्हणणेनुसार, सदर दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र. १ यांना कैफियत दयायची होती परंतु, प्रतिवादी क्र. १ हे आजारी असल्याने त्यांना कैफियत देता आली नाही व त्यामुळे त्यांच्या विरुद्ध ''कैफियत नाही''चा आदेश पारीत करणेत आला. सदर आदेश रद्दबातल न झाल्यास प्रतिवादी क्र. १ यांचे पैशाच्या स्वरुपात अपरिमित स्वरुपाचे नुकसान होणारे आहे. प्रतिवादी यांना कैफियत न देऊन अवमान करण्याचा हेतु नव्हता. सबब, सदरचा आदेश रद्दबातल होऊन मिळण्यासाठी प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करुन सदर अर्ज मंजुरीस तीव्र विरोध दर्शविला आहे. वादींच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी यांनी खोटा व खोडसाळ अर्ज दिलेला असुन कारण देखील संयुक्तीक नाही, केवळ वादी यांना न्यायास विलंब व्हावा याकरीता मुद्दामहुन वेळकाढुपणा केलेला आहे, त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास रु.५०००/– (रुपये पाच हजार मात्र) खर्चाचा आदेश पारीत करण्याची विनंती देखील वादीने म्हणण्याद्वारे केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ यांनी विहीत मुदतीत त्यांची कैफियत पटलावर दाखल न केलेने त्यांच्या विरुद्ध दि.२१.०४.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सदरचा दावा विना कैफियत चालविण्यात आला. सदरचा अर्ज दि.२०.०८.२०२४ रोजी म्हणजेच एक वर्षाहुन अधिक विलंबाने दाखल केला. अर्जाच्या पृष्ठयर्थ कोणतेही कागदपत्र जोडलेले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ने अर्जात नमुद केलेले, आजारपणामुळे त्यांना कैफियत दाखल करता आली नाही, हे कारण अर्ज मंजुरीस संयुक्तीक व समाधानकारक असल्याचे दिसत नाही. न्यायालयाचा व परीणामी वादीचा अमुल्य वेळ प्रतिवादींच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादी क्र. १ यांना त्यांची कैफियत सादर करण्याची परवानगी नाकारणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. प्रतिवादींनी सादर केलेल्या कैफियतीद्वारे दावा गुणदोषावर निकाली करणेस न्यायालयास मदतच होणारी आहे. प्रतिवादींनी केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करता येणारे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे पारीत करीत आहे :–

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. रक्कम रु.५००/–(रुपये पाचशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र.४४ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम रु.५००/–(रुपये पाचशे मात्र) प्रतिवादी क्र.१ यांनी वादीस आदा केल्यावर त्यांच्या विरुद्ध पारीत झालेला

''कैफियत नाही'' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. प्रतिवादी क्र.१ यांनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश स्वयंचलनाने रद्द झाला असे समजण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषित करण्यात आला.)

Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2024.10.10 13:27:03 +0530

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – १०.१०.२०२४. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)दोडामार्ग.